दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १६ वे ● अंक ३५१ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.१७ मार्च २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## केंद्रीय मंत्री नारायण राणे, नितेश राणे यांना मोठा दिलासा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

दिशा सालीयन मृत्यू प्रकरणी वादग्रस्त वक्तव्ये केल्या प्रकरणी केंद्रीय मंत्री नारायण राणे आणि आमदार नितेश राणे यांना दिंडोशी न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.


नितेश राणे यांचा सहभाग असलेल्या पत्रकार परिषदेत दिवंगत दिशा सालीयनबाबत वक्तव्य करीत शिवसेनेवर हल्लाबोल करणारे केंद्रीय मंत्री नारायण राणे आणि पुत्र नितेश राणे यांची मालवणी पोलिसांनी काही दिवसांपूर्वी चौकशी केली होती. दिशाच्या पालकांनी या प्रकरणी तक्रार केल्यानंतर राणेंवर दखलपात्र गुन्हा नोंदविला होता. या प्रकरणी राणे पिता पुत्रांनी न्यायालयात अटकपूर्व जामीन मिळविण्यासाठी धाव घेतली होती. आज यावर निर्णय घेण्यात आला. नारायण राणे व नितेश राणे यांना अटकपूर्व जामीन मंजूर झाला असून पंधरा हजार रुपयांचा हा जामीन मंजूर करण्यात आलेला आहे. मुंबई पोलिसांनी अशा प्रकारच्या फालतू केसेसकडे लक्ष न देता ज्या क्रिमिनल केसेस आहेत त्याकडे जास्त लक्ष द्यावे, जेणेकरून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळेल, अशी प्रतिक्रिया नारायण राणे यांचे वकील तिश मानेशिंदे यांनी दिली आहे.

### प्राथमिक शिक्षक संघाच्या शिक्षण परिषदेस लाभणार शरद पवार यांचे मार्गदर्शन

# १८ मार्च रोजी पनवेलच्या कर्नाळा स्पोटर्स अकॅडमीमध्ये भरणार भव्य शिक्षण परिषद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे वतीने शिक्षण परिषद व भव्य वार्षिक अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे.१८ मार्च रोजी आयोजित केलेल्या शिक्षण परिषदेला राष्ट्रवादीचे सर्वे सर्वा, माजी केंद्रीय मंत्री शरद पवार साहेब यांची उपस्थिती लाभणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे ऑनलाईन माध्यमातून शिक्षण परिषदेला संबोधित करणार आहेत. कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी येथे कार्यक्रमाचे आयोजनाबाबत माध्यमांना अवगत करण्यासाठी शिक्षक नेते संभाजीराव थोरात, संघटनेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अंबादास वाजे आणि आमदार बाळाराम पाटील यांनी पत्रकार परिषद आयोजित केली होती. यावेळी राज्य





सरचिटणीस बाबासाहेब जगताप, राज्य प्रतिनिधी अविनाश म्हात्रे, म. ज.मोरे मंचावर उपस्थित होते.

शिक्षक नेते संभाजीराव थोरात यांनी शिक्षण परिषदेचे आयोजनाबाबत विस्ताराने प्रसिद्धी माध्यमांशी संवाद साधला. यात संघटनेच्या निर्मितीमागील उद्देश, संघटना करत असलेले कार्य विशद केले,तसेच राज्यात प्राथमिक शिक्षकांच्या अनेक संघटना असल्या तरी देखील आमची संघटना या क्षेत्रातील दिग्गजांना शिक्षण परिषदेत बोलावून त्यांच्यासमोर आमच्या समस्या आणि आमच्या मागण्या हिरीरीने मांडत असते असे ते म्हणाले.

सदर शिक्षण परिषदेचे स्वागताध्यक्ष आमदार बाळाराम पाटील हे असून, मार्गदर्शन शिक्षण परिषदेसाठी राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष तथा जलसंपदामंत्री जयंतराव पाटील, ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, पर्यावरण व पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे, नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री आदिती तटकरे, खासदार सुप्रियाताई सुळे, खासदार सुनील तटकरे, खासदार श्रीरंग बारणे, शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत भाई पाटील, आमदार रोहित पवार, आमदार निलेश लंके, ग्रामविकास मंत्री अब्दुल सत्तार, राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, सोलापूरचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे, पनवेल चे महापौर कविता चौतमोल उपस्थित राहणार आहेत.

## १७ मार्च रोजी काळा दिन आंदोलन; गुरुवारी रास्ता रोको आंदोलन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

१७ मार्च या सिडकोच्या वर्धापन दिनी पन-वेल, उरण व बेलापूर पट्ट्यातील ९५ गावातील सिडको पीडित प्रकल्पग्रस्त भूमिपुत्र काळा दिन पाळणार आहेत. त्या अनुषंगाने लोकनेते दि. बा. पाटील यांच्या जन्मगावी त्यांच्या स्मृतींना अभिवादन करून सकाळी १०. ३० वाजता दास्तान फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.




सिडकोचा वर्धापन दिन हा प्रकल्पग्रस्त काळादिन म्हणून साजरा करणार असा निर्धार करणाऱ्या लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरण कृती समिती बरोबरच्या चर्चेत सिडको व्यवस्थापनाने कुठलेही ठोस आश्वासन न दिल्याने ही चर्चा फीस्कटली आहे. कृती समिती कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी बैठकीतच आंदोलनाचा निर्धार व्यक्त केला आहे. सिडको गेली चाळीस वर्षे प्रलंबित असलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नावर नेहमी उदासीनता दाखवत आली आहे. नवी मुंबई बसवण्यासाठी स्वतःच्या कसत्या जमिनी कवडिमोल भावाने देऊन शंभर टक्के भूमिहीन झालेल्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा असंतोष खदखदत आहे. गेली दोन पिढ्या आंदोलन करणारे सिडकोपीडित शेतकरी आता करो या मरो च्या भावना व्यक्त करू लागले आहेत. यामुळे सिडको प्रति आपला निषेध व्यक्त करण्यासाठी कृती समितीचे नेतृत्वाखाली १७ मार्च या सिडकोच्या वर्धापन दिनी काळा दिन आंदोलन करण्याचे ठरवले आहे. जेथून सिडको विरोधात आंदोलनास सुरुवात झाली त्या जासई येथील दास्तान फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालक संजय मुखर्जी यांना याबाबतचे निवेदन दिल्यानंतर सिडकोच्या वतीने निर्मल भवन मुंबई येथे कृती समिती बरोबर बैठकीचे आयोजन केले होते.

या बैठकीत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ बाबत सिडकोने केलेला ठराव विखंडित करून लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असा ठराव मंजूर करावा, जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांना विनाविलंब साडेबारा टक्केचे भूखंड वाटप, गरजेपोटी बांधकामाबाबत झालेल्या शासनाचा निर्णयातील त्रुटी आणि प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्या याविषयी चर्चा झाली. मात्र सिडकोने विमानतळ नामकरणाचा ठराव देण्यास नकार देत बाकी सर्व मागण्यांवर बैठका करू, लवकर सर्व प्रश्न सोडवू असे नेहमीच्या धाटणीची उत्तरे दिली. यामुळे कृती समिती कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह कृती समितीचे सरचिटणीस भुषण पाटील, नवी मुंबई महानगरपालिका पालिकेचे माजी विरोधी पक्ष नेते दशरथ भगत, खजिनदार जे. डी. तांडेल, अतुल दिबा पाटील, नंदराज मुंगाजी, रुपेश धुमाळ, राजेश गायकर, सुरेश पाटील, विनोद मात्रे, दीपक पाटील आदींनी आपला १७ मार्चच्या आंदोलनाचा निर्णय ठाम असल्याचे व सिडकोला प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या मान्य कराव्याच लागतील असा निर्धार व्यक्त केला.

## मुरुडला वणवे लागण्याची शृंखला सुरू

### वनखात्याच्या जाळरेषा अभियानाचे तिनतेरा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मार्च महिना सुरु होताच वणवे लावण्याच्या प्रमाणात आता प्रचंड वाढ झाली असून अक्षरशः मुरुडचा राजवाडा ते दत्त मंदिर व एकदरा डोंगर आगीच्या भक्ष्यस्थानी होरपळताना दिसत आहेत. त्यामुळे प्रचंड वनसंपदेची हानी होत असल्याने येथील जैवविविधता धोक्यात आली असून आगीच्या भीतीने पशु-पक्षांचा मोर्चा गावाकडे वळला असल्याचे चित्र दिसून येत असून याकडे वनखात्याचे दुर्लक्ष व डोळेझाक होत असल्याचे चित्र सर्वत्र पहावयास मिळत आहे. काही दिवसांपूर्वी वनखात्याने राजवाडा परिसरात जाळरेषा अभियान राबविण्यात आले होते. तरीही हे मोठे मोठे वणवे लागल्याने या अभियानाचे तिनतेरा वाजलेले पाहावयास मिळत आहे.

दररोज डोंगरांना लावण्यात येत असलेल्या वणव्यामुळे मुरुड तालुक्यातील उसरोली सुपेगाव डोंगरावर, राजवाडा परिसर ते दत्त मंदिर, एकदरा या ठिकाणचे डोंगर वणव्यात होरपळताना

.../२

## संक्षिप्त...

### प्रविण दरेकरांच्या अडचणीत भर; गुन्हा रद्द करण्याची याचिका हायकोर्टाने फेटाळली

**दै.रायगड नगरी । मुंबई**

भाजप नेते आणि विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते प्रविण दरेकर यांच्या अडचणी वाढल्या आहेत. कारण मुंबै बँकेची निवडणूक लढवताना मजूर असल्याचं दाखवल्याप्रकरणी दाखल गुन्हा रद्द करण्यात यावा, ही दरेकर यांची याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. याप्रकरणी योग्य त्या कोर्टात याचिका दाखल करा, असं न्यायालयाकडून दरेकर यांना सांगण्यात आलं आहे.

मजूर असल्याची खोटी माहिती दिल्याप्रकरणी मुंबईतील पोलीस ठाण्यात प्रविण दरेकर यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे लवकरच पोलिसांकडून दरेकरांवर कारवाई करण्यात येण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर दिलासा मिळावा यासाठी दरेकरांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

मात्र न्यायालयाने हा गुन्हा रद्द करण्याची मागणी फेटाळल्याने दरेकरांच्या अडचणीत भर पडली आहे.

दरम्यान, प्रविण दरेकर यांच्यावर राज्य सरकारकडून सूडबुद्धीने कारवाई करण्यात येत असल्याचा आरोप भाजपकडून करण्यात येत आहे. मात्र ही कारवाई कायदेशीरच असल्याचा दावा सत्ताधारी नेत्यांनी केला आहे.

### उद्या अंक नाही

होळीनिमित्त १७ मार्च २०२२ रोजी दैनिक रायगड नगरीच्या कार्यालयाला सुट्टी असल्यामुळे दि.१८ मार्च २०२२ चा अंक प्रकाशित होणार नाही. याची जाहिरातदारांनी, वाचकांनी व विक्रेत्यांनी नोंद घ्यावी.

– व्यवस्थापक

## स्वारगेट-विन्हेरे एसटीचा ताम्हिणी घाटात अपघात

**दै.रायगड नगरी । माणगाव**

स्वारगेट पुणे एस टी आगाराची बस क्र. एम एच १४ बी टी ४६८४ ही बस स्वारगेटहुन रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यात असलेल्या विन्हेरे गाव अशी दररोज प्रवास फेरी असते. या बसमधून दररोज शेकडो प्रवासी पुणे ते रायगड जिल्ह्यातील बस स्थानकांवरील इतर गावे या ठिकाणी प्रवास करत असतात. ह्या बस साठी काळाचा दिवस ठरला होता, मात्र देव तारी त्याला कोण मारी? असा प्रकार प्रकार आजच्या दिवशी या स्वागरेट विन्हेरे बसच्या बाबतीत घडला.



पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार वृत्त असे की, स्वारगेटहुन विन्हेरे कडे येणाऱ्या ह्या एस टी बस ला रायगड पुणे जिल्ह्याला जोडणाऱ्या सीमेवर व माणगाव तालुक्याच्या हद्दीत असणाऱ्या कोंडेथर गावच्या हद्दीत दुपारी १२:३० च्या सुमारास बस पलटी होऊन अपघात घडला.मात्र काळ आला होता पण वेळ आली नव्हती अश्याच उक्तीप्रमाणे, या अपघातात कोणत्याही प्रकारची जिवितहानी झाली. प्रवास करणाऱ्या प्रवाशांपैकी ९ प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. त्यांना उपजिल्हा रुग्णालय माणगांव व काही प्रवाशांना माणगाव तालुक्यातील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. घटनास्थळी माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार तोरवे व पोलीस शिपाई भारत तांदळे यांनी ताबडतोब धाव घेतली व माणगाव तालुक्यातील चांगल्या दर्जाचे सामजिक उत्तरदायित्व निभावणारी पोलाद प्रक्रिया करणारी कंपनी पॉस्को महाराष्ट्र स्टील या कंपनीच्या रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या व अपघातग्रस्तांना

.../२

## जेएसडब्ल्यू स्टील कंपनीच्या अधिकाऱ्याकडे दहा लाख रुपये खंडणीची मागणी

### चौघां विरोधात वडखळ पोलिसांत गुन्हा दाखल ; भारत सरकारच्या गाडीचा वापर

**दै.रायगड नगरी । पेण**

भारत सरकारची खोटी गाडी वापर व शासकीय अधिकारी असल्याचे भासवून पेण तालुक्यातील डोलवी येथील जेएसडब्ल्यू स्टील कंपनीच्या अधिकाऱ्याला शिवीगाळ करुन दहा लाख रुपये ची खंडणी मागणी करणाऱ्या चौघां विरोधात वडखळ पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सविस्तर वृत्त असे की, डोलवी येथील जेएसडब्ल्यू स्टील कंपनीच्या धरमतर रोड येथील कार्यालयात गुरुवारी सकाळी गणेश पोळ,रा.चेंबूर-मुंबई, जीवन महापुरे, रा.राजाराम पुरी, कोल्हापूर, महेंद्र बनसोडे रा.डेरवली, पनवेल यांनी आपण केंद्र शासनाचे शासकीय अधिकारी असून यावेळी त्यांच्या बरोबर असणाऱ्या मुरलीधर पाटील , रा.बहिरीचा पाडा, यांनी अलिबाग धरमतर-मानकुळे खाडीत बेकायदेशीर सुरु असलेला व्यवहार बंद करण्या संदर्भात सकाळी भारतीय राजमुद्रा असलेल्या लेटर पॅड वर अर्ज दिला होता. या बाबत विचारणा करण्यासाठी ही चौकडी सायंकाळी पुन्हा कंपनीच्या कार्यालयात येऊन दिलेल्या अर्जावर काय भूमिका घेतलीत यांनी अशी विचारणा करुन कंपनीतील पीआरओ डिपार्टमेंट मधील असिस्टंट मॅनेजर मंगेशकुमार थत्ते यांना शिवीगाळ करून हे प्रकरण मिटवायचे असेल तर दहा लाख रुपये दे नाहीतर आताच तुला मारून धरमतर खाडीत टाकतो, तुझी कंपनी बंद करतो अशी धमकी दिली.

या बाबत मंगेशकुमार थत्ते यांनी कंपनीचे सिक्युरिटी अधिकारी मंगेश नायगम व सुरेश कुमार यांनी याबाबत वडखळ पोलिसांत तक्रार दाखल केली. वडखळ पोलिसांनी या चौघांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता ते भारत सरकारच्या नावाची बनावट पाटी असलेली क्वालिस गाडी तसेच बनावट लेटर हेड सह ताब्यात घेतले असता हे कोणतेही शासकीय अधिकारी नसल्याचे आढळून आले. त्यांच्या वर वडखळ पोलीस ठाण्यात भा द वि कलम ३८७, ३८५, १७०, ४७३, ५०४, ५०६, ४२० व ३४ अन्वये गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. वडखळ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार अधिक तपास करीत आहेत.

## न्हावा गावातील ७८९ मच्छिमारांना आर्थिक नुकसान भरपाईबाबतच्या त्रुटी दूर करून प्रश्न मार्गी लावणार

### एमएमआरडीएच्या आयुक्तांचे आ.प्रशांत ठाकूर यांना आश्वासन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

न्हावा-शिवडी सी- लिंक प्रकल्पामुळे बाधित झालेल्या न्हावा गावातील ७८९ मच्छिमारांना आर्थिक नुकसान भरपाई मिळावी यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मागणीनुसार एमएमआरडीएचे आयुक्त यांच्यासोबत आज बांद्रा येथील कार्यालयात बैठक पार पडली. एमएमआरडीचे अधिकारी स्वतः सदर विभागात येऊन कागद्पत्रांसंदर्भात असलेल्या त्रुटी दूर करण्याचे आणि हा प्रश्न मार्गी लावण्याचे या बैठकीत एमएमआरडीए आयुक्तांनी आश्वासित केले आहे.



या बैठकीला एमएमआरडीएचे अधिकारी, पंचायत समिती सदस्या रत्नाताई घरत, न्हावे ग्रामपंचायत सरपंच हरेश्र्वर म्हात्रे, माजी सरपंच चंद्रकांत भोईर, उरण उपनगराध्यक्ष जयवीन कोळी, सागर ठाकूर, गव्हाण उपसरपंच विजय घरत, युवा नेते अमर म्हात्रे, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा वर्षा नाईक, आदी उपस्थित होते.

एमएमआरडीए बरोबर अनेक वेळा झालेल्या बैठकीत स्थानिक मच्छिमारांच्यावतीने ७८९ बाधित मच्छिमारांची यादी सादर करण्यात आली होती. काही

.../२

## कोकणातील होळी सणाच्या पार्श्वभूमीवर खेळला जाणारा आट्यापाट्या खेळ नामशेष होण्याच्या मार्गावर

**दै.रायगड नगरी । उरण**

कोकणात अनेक सण व विविध देशी खेळ वर्षानुवर्षे पारंपारिक पद्धतीने उत्साहात साजरे केले जातात. मात्र होळी सणाच्या १० दिवस अगोदर संपूर्ण कोकणात खेळला जाणारा आट्यापाट्या खेळ सध्या नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.

आट्या पाट्या हा महाराष्ट्रातील एक मैदानी खेळ आहे. भारतातील अनेक राज्यात हा खेळ वेगवेगळ्या नावांनी खेळला जातो. महाराष्ट्रात संत तुकारामांच्या काळात हा खेळ प्रचलित असल्याचे तुकाराम महाराजांच्या अभंगावरून दिसून येते असे काही तज्ञाचे मत आहे. एका संघातील खेळाडूंनी दुसऱ्या संघातील खेळाडूंना ठराविक जागेमध्ये (पाटीत /चौकोनी डब्ब्यात )अडविणे व अडविलेल्या खेळाडूंना हुलकावणी देऊन निसटून जाणे असे या खेळाचे स्वरूप आहे.या मैदानी खेळात कोंडी, हुलकावणी, शिवाशिवी अशा प्रकारांचा समावेश आहे. कोकणात हा खेळ होळीच्या १० दिवस अगोदर पासून सुरु होतो. व होळीच्या दिवशी समाप्त होतो. सर्वजण हा खेळ मोठ्या आनंदाने खेळत असतात. ग्रामीण भागात हा खेळ मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध आहे.



.../२

# विलेपार्ले येथील प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलातील जिम्नॅस्ट अनुष्का पाटीलला शिष्यवृत्ती




**दै.रायगड नगरी । मुंबई**

छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती संचालित प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल (ISO प्रमाणित) तर्फे अध्यक्ष अरविंद रमेश प्रभू व सर्व विश्वस्तांच्यावतीने स्व. डॉ. पुष्पा रमेश प्रभू यांच्या स्मरणार्थ शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप) देण्यात येणार आहे. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून संकुलाचे विश्वस्त व सचिव डॉ. मोहन राणे यांच्या शुभ हस्ते ज्युनिअर आर्टिस्टिक जिम्नॅस्ट अनुष्का पाटीलला २५ हजार रुपये रोख व मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या वर्षांपासून दरवर्षी क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्ण व उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संकुलातील एका पात्र खेळाडूला शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप) देण्यात येणार आहे. यावर्षी २०२२-२३ च्या पहिल्या शिष्यवृत्तीची मानकरी संकुलाची ज्युनिअर आर्टिस्टिक जिम्नॅस्ट अनुष्का पाटील ठरली आहे. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अरविंद प्रभू, सचिव डॉ. मोहन राणे, विश्वस्त मकरंद येडुरकर, लीना प्रभू आदी मान्यवर उपस्थित होते.

अनुष्का अजित पाटील एक राष्ट्रस्तरीय जिम्नॅस्ट आहे. नोव्हेंबर २०२१ मध्ये तिने चमकदार कामगिरी करत जम्मू येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले व उत्तम कामगिरी करत बॅलंसिंग बीम प्रकारात १ सुवर्ण व सांघिक रौप्य पदक मिळवून एप्रिल २०२२ मध्ये हरियाणा येथे होणाऱ्या खेलो इंडिया युथ गेम्स मधील आपला प्रवेश निश्चित केला आहे. २०१९ साली तिने उत्तम कामगिरी करत सब स्पर्धेत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावत राजस्थान येथे झालेल्या स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले व उत्तम कामगिरी करत वैयक्तिक २ सुवर्ण व १ रौप्य पदक पटकावत राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राला प्रथम क्रमांक मिळवून दिला. तिने आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स करण्यास ४ वर्षांची असताना प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल विलेपार्ले येथे सुरुवात केली व आजही ती ह्याच संकुलात प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली दररोज साधारण ७ हे ८ तास आपला सराव करत आहे. अनुष्का ७ वर्षांची असताना तिने मुंबई स्कूल्स स्पोर्ट्स असोसिएशनने आयोजित केलेल्या आंतरशालेय स्पर्धेमध्ये २ सुवर्ण पदके पटकावली. तसेच त्याच दिवशी तिने विबग्योर इंटरनॅशनल स्कूल्सने आयोजित केलेल्या आंतर शालेय स्पर्धेमध्येही २ सुवर्ण पदके पटकावली. तिने अनेक आंतरशालेय, जिल्हा स्तरीय, राज्य स्तरीय तसेच राष्ट्रीय स्पर्धांमध्ये उत्तम कामगिरी करत आजपर्यंत एकंदर ५ ट्रॉफीज व २७ सुवर्ण, २० रौप्य व १३ कांस्य अशी एकंदर ६० पदके मिळवली आहेत.

# निलेश नात्ती दिव्यांग प्रेरणा पुरस्काराने सन्मानित ; पाच वर्षांत दिव्यांग क्षेत्रात केलेल्या कामाची पोचपावती

**दै.रायगड नगरी । दिघी**

मागील पाच वर्षात दिव्यांग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या निलेश बारक्या नात्ती यांना रायगड जिल्हा परिषद कडून दिव्यांग प्रेरणा या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बुधवारी (ता.१६) जिल्हा परिषदेत मान्यवरांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा संपन्न झाला. संपूर्ण रायगड जिल्ह्यातील आठ दिव्यांग व्यक्तींना हा पुरस्कार देण्यात आला.

रायगड जिल्हा परिषद अध्यक्षा योगिता पारधी, समाज कल्याण सभापती दिलीप भोईर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह आणि १०,०००रु. चा धनादेश असे या पुरस्काराचे स्वरूप होते. निलेश नात्ती यांनी श्रीवर्धन आणि म्हसळा तालुक्यातील कित्येक दिव्यांग लाभार्थ्यांना संजय गांधी योजना, अंत्योदय रेशन कार्ड, पंचायत समितीच्या योजना जिल्हा परिषदेच्या योजना, खाजगी संस्थांच्या योजनेचा लाभ मिळवून दिला. दिव्यांगांच्या पुनर्वसनासाठी विविध मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन करणे, दिव्यांग कायदेविषयक मार्गदर्शन मेळावा, ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्र अद्यावत करणे असे विविध उपक्रम हाती घेऊन दिव्यांगांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महत्व पूर्ण योगदान नात्ती यांनी दिले आहे. एकता दिव्यांग कल्याणकारी संस्था श्रीवर्धन अध्यक्ष म्हणून कार्य करताना संघटनेच्या माध्यमातून दिव्यांना मोफत साहित्य (कुत्रीम अवयव) वाटपाचे कार्यक्रम हाती घेऊन दिव्यांग व्यक्तींना प्रवाहात आणण्याचे काम निलेश नात्ती यांनी प्रामुख्याने केले. निलेश नात्ती हे श्रीवर्धन तालुक्यातील वडवली गावातील रहिवासी आहेत त्यांना या मिळालेल्या पुरस्कारासाठी अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले.

# माथेरान मधील स्वच्छतेसाठी झपाटलेला अवलिया राकेश कोकळे

**दै.रायगड नगरी । माथेरान**

संत गाडगेबाबा यांनी गावागावात फिरून स्वतः हातात झाडू घेऊन कचरा गोळा केला स्वच्छता राखण्यासाठी लोकांना प्रवृत्त केले होते आणि याच माध्यमातून त्यांनी लोकांच्या मनातील क्लेश, द्वेषाची भावना, अशा षडरिपुना आवर घालण्यासाठी स्वच्छता हेच साधन वापरले होते. आणि यातूनच जनजागृती करण्याची महत्वाची भूमिका त्यांनी पार पाडली होती.

संत गाडगेबाबा यांच्या पावलावर पाऊल ठेवण्याचा प्रयत्न करत माथेरान मधील धनगर समाजाचे अध्यक्ष आणि एक सर्वसामान्य अश्वपाल ,काँग्रेसचे सक्रिय कार्यकर्ते,पंचवटी नगरचे रहिवासी राकेश विलास कोकळे यांनी मागील काही वर्षांपासून या गावातील कचरा यामध्ये प्लास्टिक बाटल्या, कुरकुरे पाकीट, गुटख्याची पाकीट त्याचप्रमाणे अन्य कचरा अनेकदा पर्यटक हे काही ठिकाणी कचराकुंडी नसल्याने जंगलात टाकतात त्यामुळे इथली वनराई धोक्यात आली आहे. जर का इथली झाडीच नष्ट झाली तर याठिकाणी चिटपाखरूही फिरकणार नाही.माथेरान हे रायगड जिल्ह्यातील एक सुंदर रमणीय ठिकाण असून वर्षाकाठी जेमतेम शंभर दिवसांचा रोजगार उपलब्ध होत असतो.

पर्यटकांची संख्या वाढण्यासाठी आपल्या गावात मुख्यतः स्वच्छता असणे गरजेचे आहे त्यामुळे काही पर्यटकांकडून जंगलात टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यामुळे पर्यावरणाला हानी होऊ शकते. यासाठी राकेश कोकळे यांनी आपले नेहमीचे सोबती गणेश बिरामने,करण जानकर,अर्जुन जानकर,पंकज कोकरे,प्रकाश मोरे,किशोर कासुर्डे,राजू जाबरे,शुभम सकपाळ,दिपक रांजाणे यांना सोबत घेऊन येथील प्रसिद्ध शारलोट लेक परिसरातील शेकडो प्लास्टिक बाटल्या त्याचप्रमाणे अन्य प्लास्टिक कचरा गोण्यांमध्ये गोळा करून सुरक्षित ठिकाणी हलविला आहे. राकेश कोकळे हे दरवर्षी पावसाळ्यात ज्या ज्या ठिकाणी रस्त्यांची दुर्दशा होते ज्या रस्त्यावरून पायी चालणे अथवा घोड्यावर पर्यटकांना नेताना घोड्याच्या पायाला दुखापत होत असते त्यासाठी योग्य ठिकाणी मातीचे बंधारे बांधले आहेत. पावसाळ्यात मातीची धूप होऊ नये यासाठी देखील ते आपल्या सोबत्यांसह सातत्याने प्रयत्नशील असतात.त्यांच्या या निस्वार्थी कार्याची पध्दत पाहून गावातील होतकरू तरुण स्वच्छता मोहिमेत पुढे येण्यासाठी आता सज्ज झालेले आहेत. अशा व्यक्तींच्या कार्यपद्धती मुळे आगामी काळात निश्चितच माथेरान हे खऱ्या अर्थाने स्वच्छता बाबतीत अग्रेसर राहील असे सुज्ञ नागरिकांमधून बोलले जात आहे.




**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

Email : mahad.ee@mahapwd.gov.in Ph.No.(02145) 222167

**ऑफलाईन निविदा सुचना क्रमांक ११० सन २०२१-२०२२**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालीलप्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या http:mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | भाग अ (स्थापत्य कामाची किंमत) | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा वरुन) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आंबेत बागमांडला रस्ता रा.मा.१०० कि.मी.१८/८०० मध्ये पांगळोली पुलाचे पुर्नबांधकाम करणे. तालुका म्हसळा, जिल्हा : रायगड (५०५४ मार्ग व पुल, ०३ राज्य मार्ग) | १३३३७५६३ | १३०५४०७२ | १३४००० | ११२०/- | ०६ महिने | वर्ग चार व वरील |
| २ | बिरवाडी वाळण सांदोशी रस्ता रा.मा.१०२ कि.मी.१९/३०० येथे पुलाचे बांधकाम करणे. तालुका महाड, जिल्हा : रायगड (पुरहानी दुरुस्ती) | २४७०५२४२ | २४३६४४२९ | १५०००० | २२४०/- | ०५ महिने | इतर |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दि.१६/०३/२०२२ (सकाळी १०.०० पासून) ते दि.३१/०३/२०२२ वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | निविदापूर्व बैठक | मा.अधिक्षक अभियंता, रायगड सा.बां.मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दि.२२/०३/२०२२ वेळ १५.०० वाजता |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधिक्षक अभियंता, रायगड सा.बां.मंडळ, कोकणभवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दि.०५/०४/२०२२ वेळ १२.०० वाजता |

टिप : परिपूर्ण निविदा http:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पाहता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/१२३८

दिनांक : १४/०३/२०२२

सही/-

(एम.आर.नामदे)

कार्यकारी अभियंता

महाड (सा.बां.) विभाग, महाड

क्र.आरओसी-२०२१-२२/क्र.५/सी ५२१०


# सर्वसामान्य मुलांना इंग्रजी शिक्षणाचे दालन उघडण्याचे प्रमाणिक प्रयत्न : मधुकर पाटील

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा तालुक्यात नामवंत इंग्रजी शिक्षण संस्था आल्या परंतु या शाळा सर्व सामान्याना परवढणार्या नव्हते.या शाळांची फी जास्त होती. त्यामुळे गोरगरिबांची मुले इंग्रजी शिक्षण शिकणार कुठे असा प्रश्न होता. कमीत कमी फी दर्जेदार इंग्रजी शिक्षणासाठी एम.बी.पाटील इंग्लिश स्कूल रुपी सर्वसामान्य मुलांना इंग्रजी शिक्षणाचे दालन उघडण्याचे प्रमाणिक प्रयत्न केल्याचे सांगत २००७ सारी ७ विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सूरू केलेली शाळा आज १६ वर्ष दर्जेदार इंग्रजी शिक्षण विद्यार्थी घेत असल्याचे एम.बी.पाटील स्कुलचे अध्यक्ष मधुकर पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या समारोप प्रसंगी व्याक्त केले. यावेळी देशपांडे सर, ग्रामसेवक अशोक गुट्टे, मुख्याध्यापिका देसाई मॅडम,शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी देशपांडे सर यांनी या शाळेची गुणवत्तेची परंपरा याही वर्षी कायम राहाणारे असून विद्यार्थ्यांनी भविष्यात या शाळेचे नाव उज्वल करतील असे सांगितले.यावेळी उपस्थित शिक्षकांनी शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना चांगले दर्जाचे शिक्षण मिळेल असे ही सांगितले.


मे.पांडे साहेब

अर्जदाराचे वकील : ॲड.सलमान रशीद पटेल

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साो. यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.३२२/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.१८/०४/२०२२

श्री.दिनेश कृष्णा नाईक
वय : ३७, धंदा : रिक्षा चालक
रा.घर क्र.४७४, फर्शीपाडा, खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका, विभाग-ओवे-खारघर — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते आहे की, अर्जदार यांचे वडील कै.कृष्णा गंगाराम नाईक हे दि.२९/०९/२००६ रोजी मौजे : फर्शीपाडा, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी मरण पावले आहेत. सदरहू अर्जदार यांनी त्यांचे वडील कै.कृष्णा गंगाराम नाईक यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होणेकरिता सदरचा अर्ज नामदार कोर्टात दाखल केलेला आहे.

कै.कृष्णा गंगाराम नाईक वर नमूद ठिकाणी मयत झाले आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर किंवा सदर अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यात मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडे सदरहू कै.कृष्णा गंगाराम नाईक यांची मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१६/०३/२०२२ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल



**महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई**

**कार्यालय : जुने सचिवालय, २ रा मजला, फोर्ट, मुंबई ३२**

**दूरध्वनी क्रमांक ०२२-२२८४४६३४**

Email : registrarmrt@yahoo.in

क्र.अध्यक्ष/टेनन्सी/रिव्ही/रायगड/३७१/१७

दिनांक : ०७/०३/२०२२

प्रति,
श्री.राम काथोड कोंडीलकर
रा.आदई, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

२) श्रीम.लक्ष्मी नथु पारंगे म.वा.
२.१) श्री.मनिष मधुकर पारंगे
२.२) श्री.अमित मधुकर पारंगे
२.३) श्रीम.राजश्री प्रल्हाद ठाकूर
२.४) श्रीम.वैशाली विनोद नाईक
२.५) श्रीम.रश्मी संतोष शेलार
२.६) श्रीम.कामिनी धर्माराज मायदे
२.७) श्रीम.शकुंतला उर्फ स्वाती गोविंद म्हात्रे
२.८) श्रीम.लता नथु पारंगे
२.९) श्रीम.सुनिता उर्फ कुसूम लक्ष्मण मायदे
२.१०) श्री.सदानंद नथु पारंगे
२.११) श्रीम.लिला आंबाजी म्हात्रे
सर्व रा.आदई, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

**विषय :- सुनावणी नोटीसीबाबत**

वरील नांव धारण करणारा, अर्जदार यांनी उपविभागीय अधिकारी पनवेल यांचेकडील क्र.टेनन्सी अपिल क्र.१३/२०१७ दि.०२/११/२०१७ च्या आदेशाबाबत केलेल्या उपरनिर्दिष्ट अर्जाची सुनावणी दि.०९/०६/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता न्यायाधिकरणापुढे खालील पत्यावर करण्याचे निश्चित केले आहे याची समज घ्यावी.

पुढील सुनावणी तारखेस तुम्ही जातीने किंवा प्राधिकृत प्रतिनिधी किंवा वकीलामार्फत न्यायाधिकरणापुढे हजर झाला नाहीत, तर न्यायाधिकरण सदरहू अर्जाची एकतर्फी सुनावणी करील व त्या संबंधात योग्य तो आदेश देईल.

सही/-
प्रबंधक
महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण
मुंबई

सुनावणीचे ठिकाण
महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई यांचे कार्यालय, जुने सचिवालय, विस्तार इमारत, २ रा मजला, फोर्ट, मुंबई-३२


पृष्ठ क्र.१ वरुन...

## मुरुडला वणवे लागण्याची शृंखला सुरू

दिसत आहेत. तर सततच्या लागत असलेल्या वणव्यामुळे डोंगरात वनसंपदेची प्रचंड हानी होत असून यामुळे पर्यावरणप्रेमी तसेच पशु पक्षी होरपळत असून नागरिकांचा जिव तुटत आहे. तर हाकेच्या अंतरावर असलेल्या मुरुड येथील वनखात्याला मात्र याच काहीच वाटत नसल्याचे एकंदरीत परिस्थितीवरून दिसून येत असल्याने वनखाते डोळेझाक करत नाही ना ? असल्याचे सर्वत्र बोलले जाते आहे.

सरकारकडून पर्यावरणावर कोट्यवधी रुपये खर्च करून जंगलात तसेच विविध ठिकाणी सामाजिक वनीकरण खाते कोट्यवधींच्या संख्येने झाडे लागवड करण्याचा अभियान राबतात. परंतु, यातील किती झाडे जगली आणि किती मेली, अद्याप याचा हिशेब लागला नाही. गेली कित्येक वर्षांपासून शिकार करणे व इतर कामासाठी डोंगरांना वणवे लावण्याचे प्रमाण वाढत असून यामुळे संपूर्ण वनसंपदेची प्रचंड हानी होते आहे.

हवामानात होणारे बदल (ग्लोबल वॉर्मिंग)मुळे निसर्गही दिवसेंदिवस आपले रूप बदलत असताना दिसत असून कधी चक्रीवादळ तर अवेळी येणारा पाऊस कोणत्याही महिन्यात कधीही पडू लागल्याने हवेतील उष्णतेचे प्रमाण प्रचंड वाढते आहे. हे असेच सुरु राहिले तर मानवी जीवनही धोक्यात येईल.अशी भिती व्यक्त होत आहे. त्यामुळे वनखात्यासह व संबंधितांनी याकडे लक्ष देऊन जंगलातील वणवे रोखण्यासाठी ठोस निर्णय घेऊन उपाययोजना करण्यात यावी. अशी मागणी वन्य प्रेमी, प्राणी मित्र, पक्षी मित्र व पर्यावरण प्रेमींमधून केली जात आहे.

## स्वारगेट-विन्हेरे एसटीचा ताम्हिणी घाटात अपघात

माणगाव या ठिकाणी उपचारासाठी हलविण्यात आले. एस टी बस च्या चालक व वाहक देखिल किरकोळ जखमी झाले आहेत.

सदर अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास माणगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव पोलीस करत आहेत.

## न्हावा गावातील ७८९ मच्छिमारांना आर्थिक नुकसान भरपाईबाबतच्या त्रुटी दूर करून प्रश्न मार्गी लावणार

त्रुटी दूर करून सादर करण्यात आलेल्या यादीला मान्यता देताना आर्थिक नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र सातत्याने पाठपुरावा करूनही एमएमआरडीए आर्थिक नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ करीत आहे. या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी एमएमआरडीचे आयुक्त यांच्या सोबत आज बैठक घेतली. २०१६ ते २०१९ पर्यंत ज्यांनी फॉर्म भरले होते त्यांना पैसे का दिले नाही या बद्दल चर्चा होवून योग्य ते निर्णय घ्या अन्यथा काम बंद केले जाईल अशी रोखठोक भूमिका या बैठकीत घेण्यात आली होती. त्यावेळी आयुक्तांनी एमएमआरडीचे अधिकारी स्वतः या न्हावा भागात येऊन कागदपत्रांची त्रुटी दूर करतील, असे आश्वासन एमएमआरडीच्या वतीने देण्यात आले आहे. त्याचबरोबर आमदार प्रशांत ठाकूर यांनी न्हावा व गव्हाण ग्रामपंचायतीला विकासकामांसाठी प्रत्येकी पाच कोटी निधी कधी देणार अशी विचारणा केली त्यावर लवकरच विकासकामांसाठी निधी देण्याचे एमएमआरडीच्या अधिकाऱ्यांनी मान्य केले आहे. यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांची शिष्टाई कामी आली आहे.

## कोकणातील होळी सणाच्या पार्श्वभूमीवर खेळला जाणारा आट्यापाट्या खेळ नामशेष होण्याच्या मार्गावर

आट्या पाट्या हा असा खेळ आहे की जो दोन संघामध्ये खेळला जातो. आणि हे संघ एकमेकांविरुद्ध खेळत असताना एका संघातील खेळाडू आपले ध्येय उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी पुढे जात असतात. आणि त्यांच्या विरुद्ध संघातील खेळाडू त्याला ठराविक ठिकाणी अडविण्याचा प्रयत्न करत असतात. परंतु ध्येय पूर्ण करण्यासाठी खेळत असणाऱ्या खेळाडूला त्याच्या विरुद्ध खेळाडूला हुलकावणी देऊन त्याच्या हातून निसटून पुढे जायचे असते. एकमेकांच्या पाठी लागणे. पाठ शिवणे, एखाद्या खेळाडूला अडवून ठेवणे, त्याची कोंडी करणे, हुलकावणी देणे या प्रकारांचा या खेळात समावेश होतो.

सध्या आट्या पाट्या हा कोकणातील खेळ कोकणातून हद्दपार होत आहे. भारताच्या प्राचीन परंपरे पैकी एक असलेल्या आट्या पाट्या हा खेळ कोकणातील ग्रामीण भागात प्रसिद्ध आहे. हा खेळ आता नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. होळी सणाच्या पार्श्वभूमीवर खेळला जाणारा हा खेळ हल्लीच्या मुला मुलींना माहित नाही. किंवा कसे खेळावे, कुठे खेळावे, खेळाचे नियम व अटी काय आहेत. याची माहिती सुद्धा अनेकांना नाही. पूर्वीच्या लोकांनी जपून ठेवलेला हा वारसा आता नामशेष होत आहे. केंद्र व राज्य शासनाने या खेळासाठी विशेष आर्थिक निधीची तरतूद करून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत या खेळाचा समावेश केल्यास नक्कीच या खेळाला चांगले दिवस येतील. यासाठी सर्वांनी आपली ही संस्कृती जपण्याची गरज निर्माण झाली आहे.


**कर्जत नगर परिषद**

KARJAT MUNICIPAL COUNCIL

ता.कर्जत, जि.रायगड, पिन-४१०२०१

Email : karjatcouncil@gmail.com ऑफिस : ०२१४८-२२२०३३

क्रकनप/भां.वि/५०८/२१-२२ — दिनांक : १६/०३/२०२२

कर्जत नगरपरिषदेकडून पात्रताधारक व इच्छुक वार्षिक ठेकेदार नेमणूक करणे करिता फेर निविदा सुचना क्र. (२) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा फॉर्म फी | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, जयंती-पुण्यतिथी तथा विविध सभा कार्यक्रमांसाठी आवश्यक साहित्य, अल्पोपहार, जेवण, हार, बुके पुरविणे | ५००/- | २०००/- (D.D.भरणे) |

कामाच्या अटी व शर्ती :-

१) निविदा पत्रक विक्रीची तारीख दि.१७/०३/२०२२ ते २८/०३/२०२२ पर्यंत सायं.५.०० पर्यंत असून निविदा स्वीकारण्याचा कालावधी दि.३०/०३/२०२२ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत राहील.

२) निविदा उघडणेचा कालावधी ३०/०३/२०२२ सायं.५.३० वा. किंवा प्रशासकीय सोयीनुसार राहील.

सही/- (डॉ.पंकज पाटील) मुख्याधिकारी कर्जत नगरपरिषद, कर्जत

सही/- (सुवर्णा केतन जोशी) अध्यक्षा कर्जत नगरपरिषद, कर्जत


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## होळी सणानिमित्त नैसर्गिक रंगासह पिचकारी व फुग्यांच्या दरात झाली वाढ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

होळी म्हटल्यावर सर्वात जास्त उत्साह बच्चे कंपनीला असतो. त्यातही या रंगांच्या उत्सवामध्ये पिचकारी खर-ेदी करण्यासाठी मुलांचा उत्साह असतो. मात्र, यावर्षी पिचकारीच्या दरात २० टक्यांहुन अधिक तर रंगाच्या दरात ३० टक्यांहुन अधिक वाढ झाली आहे. यावर्षी भीम, स्पायडरमॅन पिचकारीकडे मुले आकर्षित होत असल्याचे दुकानदारांनी सांगितले.

कोरोनाच्या वाढत्या संसर्गामुळे गेली दोन वर्षे होळी, रंगपंचमी सणावर सावट होते. मात्र, फेब्रुवारी महिन्यात कोरोनाचे प्रमाण खूप कमी झाले असून शासनाने निर्बंध देखील हटविले आहेत. त्यामुळे यावर्षी होळीला पिचकारी खरेदीसाठी मुलांच्या उत्साहात वाढ होईल, असा अंदाज वर्तवून पिचकारी आणि रंगाच्या खरेदीस चांगला प्रतिसाद मिळणार असल्याचा विश्वास दुकानदारांना वाटतो. पनवेल परिसरातील विविध दुकानांमध्ये प्राणी-पक्षांपासून ते कार्टुन्सच्या विविधरंगी पिचकाऱ्यांनी बाजारपेठ भरली आहे. त्यात छोटा भीम, डोरेमॉन, स्पायडरमॅन, बॅटमन सगळ्यांचे प्रिय अँग्री बर्ड आहेत. या पिचकाऱ्यांच्या किंमती पाचशे ते सातशे रुपयांच्या दरम्यान आहेत. तसेच रंग विक्रेत्यांनी विविध रंग छटा असलेले रंग बाजारात विक्रीसाठी ठेवले असून मागील वर्षी ५० ते ५५ रुपये किलो दराने विक्री होत असलेल्या रंगाच्या दरात यावर्षी वाढ झाली असून ती ७० ते ८० रुपये किलो प्रमाणे विक्री केले जात आहे. कोरोनाचा प्रभाव कमी झाल्यामुळे बाजारात देखील ग्राहकांच्या संख्येत वाढ होत आहे. गेले दोन वर्षे व्यवसाय ठप्प होता. मात्र, यावर्षी कोरोनाचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे ग्राहकांच्या संख्येत भर पडत असल्याचे दुकानदारांनी सांगितले.

## सहदेव कापसे राज्यस्तरीय शिक्षक भूषण पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील वरसगाव गावचे सुपुत्र व प्रा.शाळा तिसे येथे सेवेत असलेले सहदेव कापसे यांना राज्यस्तरीय शिक्षक भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

सहदेव कापसे यांना अविष्कार फौंडेशन शैक्षणिक व सामाजिक संस्था कोल्हापूर यांच्या वतीने सन २०२२ चा जागतिक विज्ञान दिनानिमित्त राज्यस्तरीय शिक्षकभूषण पुरस्कार अविष्कार फाऊंडेशनचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष व जेष्ठ पत्रकार संजय पवार यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. तर त्यांच्या विविधांगी कार्याची दखल घेऊन राज्यस्तरीय शिक्षक भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. तर सन २०१९ या शैक्षणिक वर्षात तालुकास्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार, सन २०२१ ला राज्य स्तरिय बेस्ट टिचर अँवॉर्ड आदी महत्त्वाचे पुरस्कार प्राप्त झाल्याने त्यांचे समाजातील सर्वच स्तरातून कौतुक होताना दिसत आले. तर नुकताच प्राप्त झालेला २०२२ चा शिक्षक भूषण पुरस्कार ही त्यांच्या गेली ३२ वर्षे शासकीय सेवेत शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात उत्तम प्रकारे सेवा केल्याचे फळ असल्याची प्रतिक्रिया त्यांचे मित्र-परिवार व शिक्षकवर्गातून व्यक्त केली जाऊ लागली आहे.



# दुर्गुणांची आहूती देऊन होळी साजरी करावी

**दै.रायगड नगरी । तळा**



हिंदु धर्मात हुताशनी पौर्णिमा म्हणजेच होळी पौर्णिमा वर्षातील शेवटचा सण या सणालाअंत्यत महत्त्व आहे. आपल्या जीवनात भौतिक सुखाच्या मागे लागून अपप्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत चालल्याअसून विशेषतः तरूण पिढींमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढीस लागला जात आहे आणि कायमचा राहिला असल्याचे पहायला मिळते धर्मसंस्कारसंस्कृती लोप पावली जात आहे. वडीलधारी मंडळीच्या धाक ठेवला नाही हे नीतीला धरून नाही. वाईट अपप्रवृत्ती चा नाश या हुताशनी पौर्णिमेला होळीत विसर्जन करणेअसे आध्यात्म व पुराणात सांगितले आहे. आणि आजच्या समाजाला खरी गरज आहे.

मोठ्या होळीला मोठमोठी झाडे तोडून होळीत जाळली जातात त्यामुळे जंगल संपत्तीचा र्हास होत आहे तसेच अचानक वणवा लागत असल्याने हि निसर्गाची मोठी हानी होते याची जाणीव नाही. सरकार वृक्ष लागवड व संगोपन करण्यासाठी मोठे उपक्रम राबवून लागवड केली जाते. यामध्ये सामाजिक संस्था, शाळा कॉलेज प्रतिष्ठान मधून जनजागृती केली जाते. हे तेव्हड्या पुरतेच का? पर्यावरणच्या दुष्टीने विचार करीत नाही याचा समाज जीवनावर मोठा विपरीत परिणाम होत आहे हे विचारात घेतले जात नाही.

एखाद्याचे चोरून पेंढे, गवत, सलदी होळीत टाकून जाळणे ही सद्यस्थितीत योग्य नाही. ही अपप्रवृत्ती बदलली गेली पाहिजे. काय योग्य काय अयोग्य याची जाणीव न राहील्याने तरुण पिढीभरकटत चालली आहे. याची विशेष पालक वर्गानी अधिक लक्ष देण्याची गरज आहे. दुर्गुणाची आहूती म्हणजे मनात साठलेला मळ, काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर रूपी दुर्गुण होळीत व धुलीवंदनात आकाशात भिरकावून देऊन जीवनात आनंदाची उधळण करायला शिकवणारा सण आहे. परंतु या रंगपंचमी चे बाजारीकरण झालेले जिकडे तिकडे पहायला मिळते. नैसर्गिक रंगाची ऊधळण थांबली आहे कृत्रिम रासायनिक रंगसर्वांच्याआरोग्याचा बेरंग करीत आहेत.

सणानिमित्त परिधान केलेल्या कापडांची रंग उडवून वाट लागते.रंग लावून चेहरा विद्रूप होत आहे. हे समाज विद्रोही विचार रसातळाला पोहोचणारे आहेत याचा विचार करणे ची नितांत गरज आहे. तरूणांमध्ये शिमगा सण साजरा करीत असताना पोस्त मागण्याची मोठी वाईट अपप्रवृत्ती वाढीस लागली आहे लहान मोठ्या दुकानात, पादचारी, वाहन चालक, वाहनावर कलर उडवणे, त्यांच्या नावांनी बोंब मारणे एखाद्याचे नुकसान करणे या गोष्टी मोठ्या प्रमाणावर बळावल्या आहेत. तुच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार हे वै.वामनराव पै.यांनी आपल्या जीवनाचे महत्त्व आ-चार विचार कसे आसावेत याची जनजागृती केली आहे. ही गरज आहे. सुविचार करून दुर्गुणांना होळीत राख रांगोळी करावी असे यानिमित्ताने सुचीत करावेसे वाटते.

# शिवसेना शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या दातृत्वामुळे गरजवंतांना मदतीचा हातभार

**दै.रायगड नगरी । माथेरान**

शिवसेनेचे शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी आणि मीरा फाउंडेशनच्या संचालिका रेखा चंद्रकांत चौधरी यांच्या माध्यमातून १६ डिसेंबर २०२१ पासून निराधार, दिव्यांग, गरजवंतांना दरमहिन्याला एकहजार रुपये पेन्शन स्वरूपात दिली जात आहे.सुरुवातीला १४३ लोकांनी याचा लाभ घेतला होता परंतु दरमहिन्याला गरजवंतांचा आकडा वाढत असून जवळपास दोनशे लोक या योजनेचा लाभ घेत आहेत. आज दि.१६ रोजी युवासेना उप तालुका अधिकारी प्रसाद थोरवे आणि रोहित विचारे यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये या महत्वपूर्ण पेन्शनचा चौथा टप्पा उपस्थित असलेल्या एकूण दोनशे गरजवंतांना देण्यात आला.तर जे दिव्यांग,अपंग आहेत त्यांना घरपोच ही रक्कम सुपूर्द केली जात आहे.यावेळी चंद्रकांत चौधरी, रेखा चौधरी, उपशहर प्रमुख प्रमोद नायक, जेष्ठ शिवसैनिक यो-गेश जाधव, माजी नगरसेवक नारायण कदम, प्रकाश सुतार, संदीप शिंदे, युवा सेनेचे निखिल शिंदे, गौरंग वाघेला, बाळू दाभेकर, रोहित साबळे, अल्ताफ शेख,अनिस महापुळे, अविनाश परब, शैलेश वाघेला, संतोष खाडे, नंदू धनावडे,अमोल चौगुले,युवती सेनेच्या धडाडीच्या कार्यकर्त्या अंकिता तोरणे यांसह अन्य कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

साठलेल्या पाण्याला ज्याप्रमाणे कालांतराने दुर्गंधी येऊन ते पिण्यायोग्य सुध्दा रहात नाही त्याचप्रमाणे आपल्याजवळ असणाऱ्या धनाचा उपयोग केवळ धनाचा संचय न करता त्याचा जनहितार्थ सेवेसाठी उपयोगात आणल्यास आपसूकच त्यात वाढ होत असते. गरजेपेक्षा अधिक धन असणारी मंडळी अधिकाधिक धनाची वाढ कशाप्रकारे करता येईल यासाठी अनेकांची धावपळ दैनंदिन जीवनात सुरू असते. भविष्यात धनाची आवश्यकता सर्वानाच असते परंतु त्यातील काही अंश रक्कम निराधार, दिव्यांग, गरजवंतांना सढळ हाताने दिल्यास ती रक्कम सतकर्मी लागते.माथेरान मध्ये आजही अनेक दिग्गज राजकीय पक्षांची मंडळी राजकारणात सक्रिय आहेत, हॉटेल धारक सुध्दा गडगंज श्रीमंत आहेत परंतु स्थानिकांना केवळ पाच वर्षांनी एकदाच निवडणुकी पुरताच गोंजारले जाते.त्यांच्या सुखदुःखात सहसा कुणी पुढाकार घेताना दिसत नाहीत. गावातील असंख्य कुटुंबाची आजही हलाखीची परिस्थिती आहे त्याकडे धनाढ्य लोकांचे दुर्लक्ष होत असते.त्यामुळे एक सामाजिक बांधिलकी आणि आपले कर्तव्य समजून केवळ ह्याच अनुषंगाने चंद्रकांत चौधरी यांनी निस्वार्थी भावनेने हा स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे त्यास गावातील निराधार, अपंग तसेच ज्या वयोवृद्ध मंडळींना घरातील मंडळींकडून अपमानास्पद वागणूक दिली जात आहे त्यांना औषध उपचारासाठी ही एकहजार रुपयांची रक्कम आधार ठरत आहे. यावेळी प्रसाद थोरवे यांनी आपल्या छोटेखानी भाषणात नमूद केले की, माथेरान सारख्या ठिकाणी केवळ पर्यटनावर अवलंबून असलेल्या या दुर्गम भागात वर्षातून फक्त शंभर दिवसांचा व्यवसाय उपलब्ध होत असतो चंद्रकांत चौधरी,आणि त्यांची पत्नी रेखाताई चौधरी यांसारखी दानशूर व्यक्तिमत्त्व असणारी मंडळी अस्तित्वात आहेत म्हणून गोरगरिबांना आधार प्राप्त होत आहे.खरोखरच आपण जे काही सत्कार्य करत आहेत ती वाखाणण्याजोगी कामगिरी म्हणावी लागेल आपल्या या कार्याची चर्चा सध्या कर्जत तालुक्यासह जिल्ह्यात ऐकावयास मिळत आहे असे प्रसाद थोरवे यांनी स्पष्ट केले तर जेष्ठ शिवसैनिक योगेश जाधव म्हणाले की शिवसेनेने २०१६ च्या निवडणुकीत आपल्या जाहीरनाम्यात ही पेन्शन योजना दिली जाईल असे सांगितले होते. चंदीभाईनी समस्त जेष्ठ तसेच नव्याने दाखल झालेल्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन शिवसेनेची एकहाती सत्ता स्थापन झाल्यानंतर सत्तेतील कुठल्याही प्रकारचा लाभ न घेता स्वखर्चाने चंदीभाई आणि रेखा चौधरी यांनी गोरगरिबांना ही आर्थिक मदत सुरू केली आहे. आम्ही त्यांच्या कायम सोबत आहोत असे योगेश जाधव यांनी सांगितले.




## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


## जाहीर नोटीस

उपविभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात

On Admission

आरटीएस अपिल क्र..../२०२२

१) श्री.अशोक नारायण सोनावळे
२) रणजीत नारायण सोनावळे
सर्व रा.६१९ पुलाची वाडी, डेक्कन झिमखाना,
साई सर्विस पेट्रोल पंप पुणे ४११००४ — अपिलार्थी

विरुद्ध

१) श्री.अनंता भास्कर अरिवले २) गंगु भास्कर अरिवले
क्र.१ व २ रा.चिंध्रण, पो.वावंजे, ता.पनवेल
३) मंजुला हरिचंद्र भोईर, मु.मोहोपाडा, ता.खालापूर, जि.रायगड
४) श्रीमती.नंदा पुंडलिक दळवी ५) श्री.सुनील मारुती पाटील
क्र.४ व ५ रा.उसर्ली बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड
६) कांता विठ्ठल कुरले, रा.रोहिदासवाडा, टपालनाका, ता.पनवेल
७) श्रीमती.सुनिता शंकर बांगर, रा.टिटवाळा,
पो.फळेगाव, ता.कल्याण, जि.ठाणे — सामनेवाले

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौजे : खानाव, ता.पनवेल, जि.रायगड येथील फेरफार नोंद क्र.७३२ विरुद्ध अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. प्रस्तुत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी ही दि.१८/०४/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमीन मिळकतीशी संबंधित असलेल्या व्यक्तींनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

**मौजे : खानाव, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ५ | १ | ०.०६.००<br>पो.ख.०.०८.२०<br>एकूण ०.१४.२० | ०.२२ |
| ५ | ३ | ०.०३.३<br>पो.ख. ०.००.२०<br>एकूण ०.०३.५० | ०.४७ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.
ठिकाण : पनवेल
दिनांक : १४/०३/२०२२

सही/-
उपविभागीय अधिकारी पनवेल
उपविभाग पनवेल

---

मा.मुजावर साहेब कोर्ट

अर्जदारतर्फे वकील
ॲड.प्रदीप एस. सावंत

## जाहीर नोटीस

मे.दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर सो, पनवेल यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.३७२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०२/०५/२०२२

१) श्रीमती.सावित्री मधुकर खारकर
व. वर्षे ५६, धंदा : शेती / गृहिणी
रा.पोस्ट ऑफिस जवळ, वहाळ, ता.पनवेल
२) श्रीमती.जनता दिपक खारकर
व. वर्षे ४८, धंदा : शेती / गृहिणी
रा.घर नं.१६७, खारकर आळी, तरघर, उलवा, ता.पनवेल — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — जाबदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी मालक कै.रघुनाथ गोविंद पाटील हे दि.१२/०१/२०१७ रोजी मु.पो.वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच कै.रघुनाथ गोविंद पाटील यांची पत्नी कै.जमनाबाई रघुनाथ पाटील ही देखील दि.१५/०५/२०१६ रोजी मु.पो. वहाळ, ता.पनवेल येथे मयत झालेली आहे. त्याअर्थी अर्जदार १) श्रीमती. सावित्री मधुकर खारकर, रा.पोस्ट ऑफिस जवळ, वहाळ, ता.पनवेल २) श्रीमती.जनता दिपक खारकर रा.घर नं.१६७, खारकर आळी, तरघर उलवा, ता.पनवेल यांनी खालील वर्णनाच्या संपादीत शेतजमीन मिळकतीबाबत वारसा दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

**शासनाने संपादीत केलेल्या मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | युनिट के.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|---|
| वहाळ | १४९ बी | ४८७ | ५ | ०.०६.०० |
| वहाळ | ४९० | ४९५ | ४ | ०.१३.०० |
| | | ४९३ | ६ | ०.४७.०० |
| | | ४९९ | ५ | ०.०९.०० |
| वहाळ | ४९० | ५०२ | ६ | ०.०७.०० |
| | | ५६ | ९ | ०.०३.०० |
| | | १३७ | १० | ०.०६.०० |
| | | १३७ | ६ | ०.१०.०० |
| | | ४९८ | ५ | ०.०४.०८ |
| | | २७९ | ७ | ०.०५.०० |

येणेप्रमाणे शेतजमीन मिळकतीचे वर्णन असे.

वरील अर्जदार हे मयत कै.रघुनाथ गोविंद पाटील यांचे वारस आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात हजर राहून हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांच्या अर्जाकामी पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते जर अर्जदार हे कै.रघुनाथ गोविंद पाटील यांचे वारस असल्याचे शाबित झाले तर त्यांस वारसदाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि.१६/०३/२०२२ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

## जाहीर नोटीस

आरटीएस अपिल क्र.४०/२०२१

प्रति,
१) बाळकृष्ण शंकर घारे
रा.गोहे, ता.खालापूर — अपिलार्थी

विरुद्ध

१) गजानन नामदेव पाटील
रा.गागोदे, ता.पेण, जि.रायगड
२) (पांडुरंग नामदेव पाटील) मयत
२/१) नरेंद्र पांडुरंग पाटील
रा.प्रान्मय निवास, चर्च रोड, काटरंग, खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड
२/२) संतोष पांडुरंग पाटील
रा.उंबरे, ता.खालापूर, जि.रायगड
२/३) लिलाबाई हरिश्चंद्र पाटील
रा.माडप, ता.खालापूर, जि.रायगड
२/४) सुवर्णा दत्तात्रेय पाटील
रा.रुम नं.२, अस्मिता सदन चाळ, समर्थ नगर,
वागळे इस्टेट, ठाणे ४००६०४
३) काशिनाथ नामदेव पाटील
रा.उंबरे, ता.खालापूर, जि.रायगड
४) लहू नामदेव पाटील
रा.एन.एम.एम.कामगार सह.गृह संस्था कळवा, ठाणे ४००६०५
५) तानाजी विठ्ठल पाटील
रा.गोरठण बु., ता.खालापूर, जि.रायगड
६) ज्ञानेश्वर विठ्ठल पाटील
पेट्रो केमिकल्स टाऊनशिप नागोठणे
७) हरिश्चंद्र विठ्ठल पाटील
रा.खरिवली, ता.खालापूर, जि.रायगड
८) नामदेव विठ्ठल पाटील
रा.खरिवली, ता.खालापूर, जि.रायगड
९) प्रमिला रवींद्र कर्णुक
रा.बिड खु., ता.खालापूर, जि.रायगड — सामनेवाले

वादी यांनी मौजे : गोहे, ता.खालापूर, जि.रायगड येथील फेरफार क्रमांक ६७८ चे विरुद्ध दि.१०/१२/२०१९ रोजी या कार्यालयात अपिल दाखल केले होते. प्रकरणी या न्यायालयाकडील दि.२९/०४/२०२१ रोजीचे आदेशान्वये वि.मा.अर्ज क्र.१०७/२०१९ मान्य करून अपिल दाखल करून घेण्यात आलेले आहे.

सदर अपिलाच्या मुद्यावर दोन्ही पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडणेकामी प्रथम सुनावणी दि.१६/११/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी दि.०८/०४/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत, हायड्रो कॉलनी दहिवली, कर्जत, जि.रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

प्रस्तुत अर्जामधील सर्व सामनेवाले यांनी तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| मौजे : गोहे, ता.खालापूर, जि.रायगड | १७/९ | ०-०५-० | ०.०८ |
| | १८/२ ब | ३-२५-६० | ५.४४ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.
ठिकाण : कर्जत
दिनांक : १६/०३/२०२२

सही/-
उपविभागीय अधिकारी
कर्जत उपविभाग कर्जत करिता

---

मा.गोडसे साहेब

ॲड.अनिल सुभाष जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.३६१/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२०/०४/२०२२

१) श्रीमती.गंगाबाई कचेर पाटील
वय : ७० वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्रीमती.लक्ष्मीबाई कचेर पाटील
वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी
३) श्री.दिपक कचेर पाटील
वय : ४२ वर्षे, धंदा : नोकरी
४) श्री.प्रदीप कचेर पाटील
वय : ४० वर्षे, धंदा : नोकरी
५) श्री.संदीप कचेर पाटील
वय : ३८ वर्षे, धंदा : नोकरी
६) श्री.प्रमोद कचेर पाटील
वय : ३६ वर्षे, धंदा : नोकरी
७) श्री.प्रवीण कचेर पाटील
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी
सर्व रा.कोपरा गाव/खारघर, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१० — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ व २ चे पती अर्जदार क्रं.३ ते ७ यांचे वडील कै.कचेर गोविंद पाटील हे दि.०९/०५/२०२१ रोजी नेहा रेसिडेन्सी प्लॉट नं.११०, सेक्टर १०, खारघर कोपरा येथे मयत झाले आहेत. तसेच त्यांची तळोजा, खारघर, कामोठे, धामणी, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनाची खुद्द मालकीची, नावे असलेली मिळकती आहेत त्यांचे खालीलप्रमाणे वर्णन :-

मिळकत क्रं.१
मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
सिद्धी अपार्टमेंट, सेक्टर-९, प्लॉट नं.४२, कामोठे नवी मुंबई

| मौजे | फ्लॅट नं. | क्षेत्र | मजला | विंग |
|---|---|---|---|---|
| कामोठे | १०१ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | पहिला मजला | ए |
| कामोठे | १०३ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | पहिला मजला | ए |
| कामोठे | १०४ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | पहिला मजला | ए |
| कामोठे | २०१ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | दुसरा मजला | ए |
| कामोठे | २०३ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | दुसरा मजला | ए |
| कामोठे | २०५ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | दुसरा मजला | ए |
| कामोठे | ३०१ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | तिसरा मजला | ए |
| कामोठे | ३०३ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | तिसरा मजला | ए |
| कामोठे | ३०४ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | तिसरा मजला | ए |
| कामोठे | ३०५ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | तिसरा मजला | ए |
| कामोठे | ४०२ | ४२ चौ.मी. बिल्टअप | चौथा मजला | ए |
| कामोठे | ४०३ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | चौथा मजला | ए |
| कामोठे | ४०४ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | चौथा मजला | ए |
| कामोठे | ४०५ | ३१.५९ चौ.मी. बिल्टअप | चौथा मजला | ए |

मिळकत क्रं.२
मौजे : खारघर, तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड येथील शेतजमीन मिळकती

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) |
|---|---|---|---|---|
| खारघर | ६७ | ४९ | ६ | ०-१६-० |
| खारघर | ६७ | ४९ | ८ | ०-६९-० |
| खारघर | ७५ ए | २०१ | ४+५ | ०-२४-५ |
| खारघर | ७५ ए | २०१ | २ बी | ०-३७-८ |
| खारघर | ७५ ए | २०१ | १ | ०-२३-० |
| खारघर | ७५ | १२ | १ | ०-५८-० |
| खारघर | ७५ | १४ | ५ | ०-२६-४ |
| खारघर | ७५ | ८६ | २+४ ए | ०-०७-८ |
| खारघर | ७५ | ९२ | २ | ०-४०-० |
| खारघर | ७५ | ९३ | १ | ०-६८-० |
| खारघर | ७५ | ११८ | ६ | ०-०५-८ |
| खारघर | ७५ | १२५ | ५ | ०-०९-८ |
| खारघर | ७५ | १२८ | २ | ०-३७-०३ |
| खारघर | ७५ | १३५ | ३ | ०-१५-० |
| खारघर | ७५ | १३५ | ६ | ०-०९-१ |
| खारघर | ७५ | १५० | १ | ०-३३-०८ |
| खारघर | ७५ | १५१ | २ | ०-०३-५ |
| तळोजा | ७५ | ८४ | १ | ०-३५-६ |
| तळोजा | ७५ | ९१ | २ | ०-६२-९ |
| तळोजा | २९१ | ३०७ | ८ | ०-१६-९ |
| तळोजा | २९१ | ३०८ | १२ | ०-०९-६ |

मिळकत क्रं.३
सातबारा धामणी, ता.पनवेल, जि.रायगड येथील शेतजमीन मिळकती

| | | | |
|---|---|---|---|
| धामणी | ३ | १८/ई | ३-४४-८० |

मिळकत क्रं.४
मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील घर मिळकती

| अ.क्र. | घर नंबर | मौजे : गावाचे नाव |
|---|---|---|
| १ | २४१ | खारघर |
| २ | २८७/अ | खारघर |
| ३ | २६०/अ | खारघर |
| ४ | ५५८ | खारघर |
| ५ | ५३७/अ | खारघर |
| ६ | ५३७ | खारघर |
| ७ | ५३७/अ १ | खारघर |
| ८ | ५३७/ब १ | खारघर |

कै.कचेर गोविंद पाटील यांच्या मिळकतीबाबत फायदे घेण्याकरिता अर्जदार यांस वारसदाखला मिळणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार यांस वारसदाखला मिळणे कायद्याचे दृष्टीने योग्य व उचित आहे. सबब अर्जदार यांनी सदरचा अर्जात पॅरा नं.३ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.कचेर गोविंद पाटील यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळवून घेण्याकरिता सदरचा अर्ज वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकती ह्या कै.कचेर गोविंद पाटील यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख १५/०३/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# सेझ विरोधी संघर्ष समिती आक्रमक ; शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा

**दै.रायगड नगरी । पेण**

तिसरी महामुंबई म्हणून ओळख निर्माणझालेल्या पेण परिसरात सेझ पुन्हा डोकं वर काढू लागला आहे. मात्र सेझ विरोधी संघर्ष समिती आक्रमक झाली असून शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्यासाठी २४ गांव सेझ विरोधी संघर्ष समितीची महत्वपूर्ण बैठक पेण येथे संपन्न झाली.

यावेळी सुभाष म्हात्रे, आर.के.पाटील, दिलीप पाटील, काशिनाथ पाटील, सि.आर.म्हात्रे, सी.जी. पाटील, राजन झेमसे, चंद्रहास म्हात्रे, किरण म्हात्रे, गंगाधर ठाकूर, विजय पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते. संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष सुभाष म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत, सेझला जमिन विकलेल्या सर्वच्या सर्व शेतकऱ्यांच्या शेतजमिनी शेतकऱ्यांना परत कोणत्यापद्धतीने मिळवून देता येतिल याही विषयांवर महत्वपूर्ण चर्चा करण्यात आली.



यावेळी प्रास्ताविक मध्ये बोलताना आर.के. पाटील यांनी सांगितले की, गोरगरीब शेतकरी सध्या खूप संभ्रमात आहे. त्यांना योग्य सल्लयाची आवश्यकता आहे. सेझ कडून शेतकऱ्यांची फसवणूक होण्याचा धोका वाटत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीवरील सेझ कंपनीचे नाव कमी करण्यासाठी गावोगावी बैठका घेण्यात याव्या.

आंदोलन सम्राट एन.डी.पाटलांच्या नेतृत्वाखाली वाशी, वढाव विभागाने सेझ विरोधी लढाई जिंकली होती. त्यावेळी झालेल्या जनमत चाचणीत सेझला ९६% शेतकऱ्यांनी विरोध नोंदविला होता. शेतकऱ्यांनी विकलेल्या जमिनी कायदेशीर मार्गाने शेतकऱ्यांना मिळणार असल्याचे लक्षात आल्याने सेझ कंपनी आता वेगवेगळ्या मार्गाने स्थानिक एजंटाना मध्ये टाकून शेतकर्यांची फसवणूक करण्याचा प्रयत्न करत असल्याचे आरोप दिलीप पाटील यांनी केले.

गेल्या काही दिवसांपासून खारेपाट विभागात कागदावर सहया घेवून शेतकऱ्यांचे आधारकार्डच्या झेरॉक्स गोळा केले जात असल्याचे आरोप माजी सरपंच काशिनाथ पाटील यांनी करत सेझ हद्दपार करण्यासाठी जसे आपण सर्वजण एकत्र लढलो त्याच पद्धतीने शेतकऱ्यांच्या जमिनी शेतकऱ्यांच्या पुन्हा मिळण्यासाठी लढाई लढून आपण ती जिंकू अशी आशाही काशिनाथ पाटील यांनी यावेळी व्यक्त केली.

यावेळी बैठकीचे अध्यक्ष सुभाष म्हात्रे यांनी शेतकऱ्यांच्या जमिनी मिळवून देण्यासंदर्भात कायदे विषयक महत्वाचे मार्गदर्शन केले. या बैठकीत दिलीप पाटील यांची २४ गांव सेझ विरोधी संघर्ष समितीच्या अध्यक्ष पदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

## संक्षिप्त...

### शेकापच्या आंदोलनाला यश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महादेव वाघमारे यांच्या खड्डा खोदून निषेध आंदोलनाच्या इशाऱ्याला सिडको नमले महानगरगॅस ने खांदा कॉलनीतील पाईपलाईन टाकण्यासाठी खोदलेल्या रस्त्याचे डांबरीकरण सुरू खांदा कॉलनीतील संपुर्ण रस्ते खड्डेमय झाले होते. नागरिकांच्या तक्रारीनुसार महादेव वाघमारे शेकाप कार्याध्यक्ष पनवेल यांनी सिडकोला २५ फेब्रुवारी रोजी सिडको कार्यालय नवीन पनवेल कार्यालया समोर ७ मार्च रोजी खड्डा खोदून आंदोलन करणार आहे असे पत्र दिले होते.

सिडकोचे अधीक्षक अभियंता पी बी मोहिले यांनी सदर आंदोलनाची दखल घेऊन २८ फेब्रुवारी रोजी महादेव वाघमारे यांना पत्र देऊन १५ तारखेपर्यंत काम सुरू करू असे सांगितले होते. त्याप्रमाणे सिडकोने आज १६ मार्च रोजी सकाळी ११ वाजल्यापासून खांदा कॉलनी सेकटर ९ पासून काम सुरू केले आहे. यावेळी सिडको अधिकारी देकाटे, गणेश पाटील माजी उपनगराध्यक्ष पनप, विजय काळे, योगेश कोठेकर, मंगेश अपराज, अनिकेत भंडारे, सचिन डोंगरे, रमेश पाटील, सुदेश खताटे उपस्थित होते.



### अनुव्रत विश्व सोसायटी व शिवसेना पनवेल तर्फे ईको - फ्रेंडली होळी खेळण्याचे आवाहन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अनुव्रत विश्व सोसायटी तर्फे ईको – फ्रेंडली होळी खेळण्याचे आवाहन सर्व नागरिकांना करण्यात आले आहे याचे सहप्रचारक शिवसेना पनवेल शहर शाखा आहे, तसे आवाहन दोघांच्या संयुक्त विद्यमाने शिवसेना पनवेल शहर शाखेत करण्यात आले.

स्वस्थ होळी, सुस्वभावाची होळी या ब्रीद लाईन अंतर्गत पाण्याचा वापर टाळा, केमिकल युक्त रंगांचा वापर टाळा, प्राकृतिक गुलालाचा वापर करा, मैत्री व सद्भावना वाढवा, तसेच प्रतिष्ठापूर्ण पद्धत स्वीकारून आपले जीवन संयमी बनवा असे आवाहन यावेळी करण्यात आले. यावेळी पनवेल शहर प्रमुख प्रवीण जाधव, उपशहरप्रमुख सुजन मुसलोंडकर, सनी टेमघरे, शैलेश जगनाडे, अब्रार मास्टर, शाखा प्रमुख संतोष तळेकर, अभिजित साखरे, आकाश भोईर, नंदू मांढरे, दिलीप शेलार, प्रशांत नरसाळे, किरण गायकवाड, विजय शिंदे तसेच अनुव्रत विश्व भारती सोसायटीचे रायगड संयोजक राजेश मेहता, पूर्व संयोजक सुरेश पटवारी, सदस्य जयेश सामर, प्रमोद डांगी, पदम चोरडिया आदींच्या उपस्थित सर्व नागरिकांना ईको फ्रेंडली होळी खेळण्याचे आवाहन सर्व नागरिकांना करण्यात आले.

# पाली-खोपोली राज्य महामार्ग होणार तरी कधी? ; या रस्त्याची पाहणी करणारे अधिकारी गेले तरी कुठे?

## ग्रामस्थसह प्रवासी वाहन चालकांचा संताप सवाल?

**दै.रायगड नगरी । खोपोली**

पाली – खोपोली राज्य महामार्गाच्या रुंदीकरण व काँक्रिटीकरणाचे काम २०१६ पासून सुरू असून जागो जागी प्याच सोडण्यात आले आहेत. तीन ते चार वर्षांपासून संथ गतीने सुरू असलेले काम, रस्त्यावरील खड्डे आणि निकृष्ट दर्जाचे काम अशा विविध समस्येच्या गर्तेत हा महामार्ग सापडला आहे. त्यामुळे कोटी रुपयांचा चुराडा होताना दिसत आहे. या मार्गाचे काम सुरू झाल्यावर वाहनचालक व प्रवाशांना अत्यंत उत्तम दर्जेदार रस्ता मिळणार अशी अपेक्षा होती. मात्र, यावर पाणी फिरतांना दिसत आहे. सुरुवातीस हा मार्ग बनविण्याचे काम मोनिका कन्ट्रक्शनकडे होते. मात्र, दर्जाचे व ढिसाळ कामामुळे त्यांचे कंत्राट रद्द करण्यात आले. आता नव्याने कंत्राटदाराचे कामदेखील निकृष्ट दर्जाचे व ढिसाळ असल्याचे नागरिकांन मधून बोलले जात आहे.



नव्याने बांधण्यात आलेला काँक्रीटच्या रस्त्याला अक्षरश: अनेक ठिकाणे तडे पडले आहेत. अर्धवट कामामुळे रस्ता ठिकठिकाणी खराब झाला असून जागो जागी पॅच ठेवण्यात आले असल्याने अनेक ठिकाणी खड्डे पडले व मोठ्या दगडीचे गोटे रस्त्यावर निघाले आहेत.ह्या दगरी रस्तेच्या मध भागी असल्याने कार व दुचाकी वाहानांला रस्ता काढण्या साठी तारेवरची कसरत करावी लागत आहे.

अनेक वेळा ह्या गाड्या दगडीवर आदलल्याने गाड्यांचे नुकसान होत असून लहान–मोठे अपघात ही झाल्याचे प्रवासी वाहान चालकानं मधून बोलले जात आहे. हे खड्डे चक्क मातीने बुजविले जात आहेत. त्यामुळे धुरळ्याच्या त्रास तर होत आहेच. मात्र, वाहने जाऊन खड्ड्यातील माती निघून खड्डे देखील वाढले आहेत.खड्डे आणि निकृष्ट रस्त्यामुळे अपघातांमध्ये वाढ होत आहे. अशा असंख्य कारणांमुळे या मार्गावरून प्रवास करणे जिगरीचे झाले आहे. शासन कोट्यवधी रुपये खर्च करते, पण रस्त्याच्या गुणवत्तेकडे लक्ष का दिले जाते नाहीं ?असा सवाल ग्रामस्थांकडून विचारला जात आहे.

हा मार्ग खोपोली हुन कोकणाकडे जाण्यासाठी वाहतूक व प्रवासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. हे मार्ग मुंबई–गोवा महामार्गाला पर्याय मानला जातो, तसेच मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग व मुंबई–गोवा महामार्गाला जोडतो. त्यामुळे या मार्गावर वाहनांची दिवस–रात्र वरदल सुरू असते. हा रस्ता लवकरच लवकर करा? नाहीतर ज्या ठिकाणी प्याच सोडला आहे त्याला तरी किमान दुरुस्त करा? एम. एस. आर. डी. सी.चे अधिकारी गेले तरी कुठे? मोठे जीवघेणे अपघात झाल्यावर या अधिकारी प्रवासी वाहन चालकांना सुविधा देणार का? असा सवाल प्रवासी वाहन चालकांनी मधून होत आहे.

# इमारतीवरुन पडून कामगाराचा मृत्यू; पेंटीग कॉन्ट्रॅक्टर विरुध्द गुन्हा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा येथील स्वर्ण जीवन इमारतीत रंगकाम करताना, चौथ्या मजल्यावरुन खाली पडून एका कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. सदर मृत पावलेल्या कामगाराला कॉन्ट्रॅक्टरने सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारचे साहित्य न पुरविल्याने दुर्घटना घडल्याचे आढळून आल्याने तळोजा पोलिसांनी या घटनेला संबधित कॉन्ट्रक्टरला जबाबदार धरुन त्याच्या विरोधात निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे.

सदर दुर्घटनेत मृत झालेल्या कामगाराचे नाव रावेंद्र भगवान शाहु (२१) असे असून तो तळोजा फेज–२ मध्ये रहात होता. तसेच तो त्याच भागातील स्वर्ग जीवन या इमारतीचे रंगकाम करत होता. रावेंद्र शाहु आणि अरुण यादव असे दोघेजण सदर इमारतीच्या बी–विंग मधील मजल्यावर रंग काम करण्यासाठी टेरेसवरुन इमारतीच्या डक्टमध्ये उतरले होते. यावेळी डक्टमध्ये उभे राहण्यासाठी आडवे बांबू लावण्यात आले होते. रावेंद्र सदर डक्टमध्ये उतरल्यानंतर त्याच्या पाया खालचा बांबु तुटल्याने तो पहिल्या मजल्यावर खाली पडून गंभीर जखमी झाला. त्यामुळे त्याला पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असता, तेथील डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. सदर घटनेनंतर तळोजा पोलिसांनी आकस्मिक मृत्युची नोंद करुन दुर्घटनेचा सख–ोल तपास केला असता, स्वर्ण जीवन इमारतीच्या रंगकामाचा ठेका घेणारा पेंटीग कॉन्ट्रॅक्टर रणजीत डिगाल याने सदर इमारतीवर काम करणाऱ्या कामगारांना त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असलेले हेल्मेट, सीट हॉर्नेस (सेफ्टी बेल्ट), हँगींग रोप, आदि साहित्य पुरविले नसल्याचे आढळून आले. त्यामुळे रावेंद्र भगवान शाहू रंगकाम करताना इमारतीच्या चौथ्या मजल्यावरुन खाली पडून त्याचा मृत्यू झाल्याचे आढळून आले. त्यामुळे तळोजा पोलिसांनी सदर घटनेला पेंटीग कॉन्ट्रॅक्टर रणजीत डिगाल याला जबाबदार धरुन त्याच्या विरोधात निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल केला आहे.

# तरुणांनी व्यसनांपासून कायम दूर राहावे : देवेंद्र पोळ

**दै.रायगड नगरी । पेण**

व्यसन म्हणजे मृत्यूला आपण स्वतःहून घातलेला विळखा असून तरुणांनी व्यसनांपासून दूर राहावे असे आवाहन पेण पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांनी माझी वसुंधरा उपक्रमांतर्गत पेण शहरांमध्ये कुठेही थुंकू नका या जाणीव जागृती फेरी दरम्यान बोलताना केले.

या जाणीव जागृती फेरी मध्ये पेण नगरपालिकेचे आरोग्य निरीक्षक शिवाजी चव्हाण, पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ, प्रा.उदय मानकवळे, मनोरमा मानकवळे व मोठ्या संख्येने विद्यार्थी वर्ग सहभागी झाले होते. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्त माझी वसुंधरा उपक्रमांतर्गत पेण शहरांमध्ये कुठेही थुंकू नका जाणीव जागृती फेरी दरम्यान बोलताना देवेंद्र पोळ यांनी सांगितले की, व्यसन ही समाजाला लागलेली सर्वात मोठी कीड आहे. तरुणांनी तंबाखू, सिगारेट, बिडी, दारू, गुटखा व अंमली पदार्थांच्या आहारी न जाण्याचे त्यांनी शेवटी आवाहन केले. जीवनाला हो म्हणा अंमली पदार्थांना नाही म्हणा, तंबाखू सोडा कर्करोग टाळा', सोडा तंबाखू, सिगारेट, बिडी, दारू, गुटखा नाहीतर मृत्यू घालेल तुम्हाला विळखा. आपले शहर स्वच्छ ठेवा ही आपली प्रत्येकाची जबाबदारी . अशा विविध घोषणा देऊन पेण शहरामध्ये जाणीव जागृती रॅली काढण्यात आली. पेण नगरपरिषद, पेण पोलीस स्टेशन पेण व प्रायव्हेट हायस्कूल ज्युनिअर कॉलेज पेण यांच्या संयुक्त विद्यमाने ही जाणीव जागृती फेरी काढण्यात आली.

# प्रशासक सुरेखा भणगे-शिंदे यांच्या कार्यालयीन वन संकल्पनेला सुरुवात

**दै.रायगड नगरी । माथेरान**

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या उक्तीला साजेशी संकल्पना माथेरान नगरीच्या उत्तम प्रशासक तथा कार्यतत्पर मुख्याधिकारी सुरेखा भणगे–शिंदे यांनी माथेरान मधील वृक्षवल्ली कायमस्वरूपी अबाधित राहून इथले पर्यटन त्याचबरोबर पर्यटनावर आधारित असलेल्या समस्त माथेरान करांना रोजगाराच्या संधी उप–लब्ध व्हाव्यात यासाठी वृक्षारोपण करणे ही काळाची गरज लक्षात घेऊन होळी या सणाच्या पूर्व संध्येला, वृक्ष तोड करून होळी सण साजरा करण्याऐवजी, वृक्षलागवड करून, हा सण साजरा करण्याचे आव–ाहन पालिका प्रशासनाकडून केले असून त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी त्यांनी आपल्या कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन वृक्षारोपण करण्यास सुरुवात केली आहे.



त्यासाठी कार्यालयीन वन ही संकल्पना आणि याची मोहीम सुरु केली आहे. यात कार्यालयातील सर्वच कर्मचारी, अधिकारी हे कार्यालयाच्या मोकळ्या जागी, पर्यावरण, व माथेरान मधील जैवसृष्टीला पोषक, पशु पक्षी यांना पूरक अशी ४० वृक्ष आज संपूर्ण स्टाफने लावली आहेत.

आणि ही लावलेली झाडे जगविण्याची जबाबदारी संबंधित अधिकारी, कर्मचारी यांच्यावर सोपविण्यात आली आहे. सर्वच उपस्थितानी ही झाडे जगविण्याचे आणि वाढविण्याचे आज स्वतःशीच वचन घेतले आहे.त्यामुळे नक्कीच येणाऱ्या काही महिन्यात ओसाड पडलेली जागा आता हरित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हरित माथेरान सोबतच कार्यालय परिसर देखील आगामी काळात हरित होणार आहे.तेथे नागरिकांसाठी बैठक व्यवस्था कालांतराने करण्यात येणार आहे. हा परिसर, पालिका हॉस्पिटल, पालिका कार्यालय, व अधिक्षक कार्यालया जवळ असल्याने, काही कामासाठी नागरिक, या कॅम्पस मध्ये आल्यास जर शासकीय, किंवा वैद्यकीय ठिकाणी वेळ लागणार असेल तर एक विरंगुळा आणि क्षणभर विश्रांती साठी देखील इथे नागरिक बसू शकतील, आणि एकाच दिवशी संपूर्ण कामे करून घरी जातील.असे प्रशासक सुरेखा भणगे–शिंदे यांनी सांगितले.

# मुरुडमध्ये केंद्रस्तरीय शाळा व्यवस्थापन समिती प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड जंजिरा नगरपरिषद शाळा क्रमांक ४ मध्ये शाळा व्यवस्थापन समिती प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी मान्यवर शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दामोदर खरगावक़र, रोहिणी सावकार, उमेश बैकर, आशिल ठाकुर, सुप्रीया रहाटे, केंद्रप्रमुख अनघा चौलकर, प्रशिक्षक राजश्री गजने, महेंद्र हावरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करण्यात आले.

मान्यवर व सर्व नगरपरिषद शाळांच्या व्यवस्थापन समिती सदस्य (प्रशिक्षणार्थी ) सर्व शाळाचे मुख्याध्यापक राजेश भोईर, अनघा चौलकर, कल्पना पेणकर, राजश्री गजने, आरती थोरवे, खलीदा नाखुदा या सर्व उपस्थितांचे पुष्पगुच्छ देऊन शब्द सुमनाने स्वागत केले. तज्ज्ञ मार्गदर्शक राजश्री गजने मॅडम व महेंद्र हावरे सर यांनी शाळा व्यवस्थापन समिती पुर्नगठन व्यवस्थापन समितीची कर्तव्य आणि जबाबदारी, या विषयाअंतर्गत शासनाच्या विद्यार्थ्यांना मिळणा–या योजनेत असणाऱ्या बाबी, बालकांचे हक्क व संरक्षण, शाळा विकास आराखडा, शाळा व्यवस्थापन समिती सक्षमीकरण आपत्ती व्यवस्थापन या विषयीचे उदाहरणासह उत्तमप्रकारे मार्गदर्शन केले.

तद्नंतर व्यवस्थापन समिती सदस्यांकडून शाळेबाबत आपल्या ज्या अपेक्षा असतील त्या लिहून घेण्यात आल्या. यावर चर्चा करण्यात आली. चर्चत राजेश भोईर सर, महेंद्र हावरे सर आशील ठाकुर,सुप्रीया रहाटे यांनी आपापले विचार व्यक्त केले. समस्या सोडविण्यासाठी जर पालकांचे सहकार्य जास्त मिळाल्यास शाळेच्या असणा–या समस्याचे निराकरण लवकरच होण्याची शक्यता मिळेळ असे निदर्शनास आणून दिले. याच बरोबर आपण आपल्या मराठी शाळा टिकणे किती गरजेचे आहे. याविषयी प्रतिपादन करण्यात आले. केंद्रस्तरीय प्रशिक्षण दिनांक १४ मार्च ते १५ मार्च २०२२ या दोन दिवसाच्या कालावधीत खेळी मेळीच्या वातावरणात संपन्न झाले. संध्या नागे यांनी सर्व उपस्थितांचे मनः पूर्वक आभार मानून दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# प्रशासन नरमले; उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे यांची यशस्वी शिष्टाई टिळक यांचे आमरण उपोषण अखेर स्थगिती

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायत प्रशासनाने दिलेल्या आश्वासनानंतर तळा नगरपंचायतीत विविध मागण्यांसाठी आमरण उपोषणाला बसलेले पत्रकार विराज टिळक यांनी उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतला. विराज टिळक यांनी ११ मागण्या केल्या होत्या, दोन मागण्या सोडून आम्ही त्यात आणखी काही मागण्यांची भर घालून त्या पूर्ण केल्या आहेत. आता मागे काहीच ठेवायचे नाही असा निर्णयच नगरपंचायतीने घेतला आहे. आता या सर्व मागण्या मार्गी लावण्यात येत आहेत, असे उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे यांनी सांगितले.

टिळक यांचा आमरण उपोषणाचा आजचा दुसरा दिवस होता. नगराध्यक्षा अस्मिता भोरवकर उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे पत्रकार संजय रिकामे कैलास पायगुडे यांनी टिळक यांची उपोषण स्थळी भेट घेतली.त्यांच्यासोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मात्र, आपण लेखी आश्वासनाशिवाय हे उपोषण मागे घेणार नाही अशी भूमिका टिळक यांनी घेतली. चर्चेनंतर प्रमुख मागण्या नगरपंचायत मान्य करत असल्याचे उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे यांनी टिळक यांना सांगितले.त्याचबरोबर नगरपंचायतीने आपल्या मागण्या मान्य केल्याचे लेखी आश्वासन देत उपोषण मागे घेण्याची विनंती केली. त्यानंतर फळाचा रस घेत टिळक यांनी आपण उपोषणास स्थगीती देत असल्याचे जाहीर केले.



विराज टिळक यांच्या मागण्यांना नगरपंचायतीने आशवासन खालील प्रमाणे दिले आहे. १. गटारावर झाकणे टाकावीत जेणेकरून अपघात टळतील.– काम सुरू असून ४ महिन्यात पूर्ण केले जाईल. २. नाना नानी पार्क पाच महिन्यात दुरुस्ती करण्यात येईल. ३. तळा शहरात सुशोभिकरण–जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल मंजूर होताच एक वर्षात काम करण्यात येईल. ४. डम्पिंग ग्राउंड ची व्यवस्था करणे–आंबे येथील गावठाणाची जागा मंजूर झाले असून स्थानिक ग्रामस्थांशी चर्चा करून त्यातून मार्ग काढला जाईल एक वर्षात काम पूर्ण होईल ५. मोकाट गुरांसाठी कोंडवाडा–जागेची पाहणी सुरू आहे ६. पाण्याच्या व्हॉल्वच्या ठिकाणी बंदिस्त चेंबर करणे–चार महिन्यात काम पूर्ण होईल. ७. रस्त्यावरचे सांडपाणी गटारात जाण्यासाठी व्यवस्था करणे–काम सुरू आहे त्यासाठी दोन वर्षाचा कालावधी लागेल ८. लहान मुलांना खेळण्यासाठी बाल उद्यान तयार करणे–. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल मंजूर होताच एक वर्षात काम करण्यात येईल. ९.श्री चंडिका माता मंदिर येथे जाणाऱ्या रस्त्यावर सुशोभीकरण करून सावली निर्माण करणारी झाडे तसेच वृद्धांना बसण्यासाठी बाकडयांची व्यवस्था करणे आणि रोहा तळा चौकापासून तळा शहरापर्यंत दोन्ही बाजूला सावली देणारी झाडे लावणे माहे १५ जून २०२२ ते ३१ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये वृक्ष लागवड आणि वृद्धांसाठी बाकडयांची सोय करण्यात येईल.